गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक १२६ वा | शनिवार २३ सप्टेंबर २०२३ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 126 | Date : 23/09/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4

## भारताचा ऑस्ट्रेलियावर पाच विकेटने विजय, वनडे रँकींगमध्येही केला 'नंबर वन'वर कब्जा




नवी दिल्ली : मोहाली येथील एकदिवसीय सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाचा पाच विकेटने पराभव केला. ऑस्ट्रेलियाने दिलेले २७७ धावांचे आव्हान भारताने आठ चेंडू आणि पाच विकेट राखून सहज पार केला. शुभमन गिल, ऋतुराज गायकवाड, सूर्यकुमार यादव आणि कर्णधार केएल राहुल यांनी अर्धशतके ठोकली. या विजयासह तीन सामन्याच्या मालिकेत भारताने १-० ने आघाडी घेतली.

या विजयासह भारताने वनडे क्रिकेटमध्ये अव्वल स्थान पटकावलेय. भारतीय संघ तिन्ही फॉर्मेटमध्ये पहिल्या स्थानावर विराजमान आहे. आयसीसीने पोस्टर पोस्ट करत भारतीय संघाला शुभेच्छा दिल्या आहेत. ऑस्ट्रेलियाने दिलेल्या २७७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारताने दणक्यात सुरुवात केली. शुभमन गिल आणि ऋतुराज । पान २ वर

## 'एक देश, एक निवडणूक' संदर्भात समितीची आज पहिली बैठक

नवी दिल्ली : 'एक देश, एक निवडणूकी'साठी स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक शनिवारी (२३ सप्टेंबर) रोजी पार पडणार आहे. सकाळी ११ वाजता दिल्लीमध्ये या बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. या समितीचं अध्यक्षपद माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद (ठरापरींह घेौंळपव) यांच्याकडे सोपवण्यात आलं. दरम्यान या बैठकीमध्ये कामाचा आरखडा कसा तयार करायचा यासंदर्भात चर्चा होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. या बैठकीसाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्यासह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन मेघवाल, कायदा सचिव आणि इतर अधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आलीये. या बैठकीविषयी माहिती देताना माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी ओडिशामध्ये म्हटलं होतं की, '२३ सप्टेंबर रोजी ही बैठक पार पडणार आहे.



लोकसभा, विधानसभा, नगरपालिका आणि पंचायतींच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याच्या मुद्द्यावर शिफारशी करण्यासाठी आठ सदस्यीय उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यासाठी केंद्र सरकारने २ सप्टेंबर रोजी अधिसूचना जारी केली होती. या समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी ही रामनाथ कोविंद यांच्याकडे सोपवण्यात आली. तर या समितीचे सदस्य म्हणून गृहमंत्री अमित शहा, राज्यसभेतील माजी विरोधी पक्षनेते गुलाम नबी आझाद आणि एनके सिंग यांचा समावेश करण्यात आला आहे. लोकसभेतील काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी हे देखील या समितीचे सदस्य होते, परंतु त्यांनी अलीकडेच शहा यांना लिहिलेल्या पत्रात समितीचा भाग होण्यास नकार दिला. याशिवाय ज्येष्ठ वकील हरीश साळवे, लोकसभेचे माजी सरचिटणीस सुभाष कश्यप आणि संजय कोठारी यांचाही समितीत समावेश आहे.देशात सध्या एक देश, एक निवडणूक लागू करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. त्याच अनुषंगाने ही समिती घटना, लोकप्रतिनिधी कायदा आणि इतर कायद्यांमध्ये किंवा नियमांमध्ये कराव्या लागणाऱ्या सुविधांचे परीक्षण करुन शिफारस करेल. तर एका वेळी निवडणुका घेतल्यास पक्षांतरासारख्या समस्या उद्भवू शकतील का याचे देखील परीक्षण ही समिती करणार आहे.

## प्रज्ञान रोव्हर आणि विक्रम लँडर आज जागे होतील

श्रीहरिकोटा : चांद्रयान-३ चे विक्रम लँडर आणि प्रज्ञान रोव्हर सध्यातरी झोपलेल्याच अवस्थेत आहेत. इस्रोच्या स्पेस ॲप्लिकेशन सेंटरचे संचालक नीलेश देसाई म्हणाले की, चांद्रयान-३ म्हणजेच प्रज्ञान रोव्हर- विक्रम लँडरला उद्या शनिवारी उठवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. चंद्रावर सध्या सकाळ आहे. प्रकाश पूर्णपणे उपलब्ध आहे. पण चांद्रयान-३च्या लँडर आणि रोव्हरला अद्याप पुरेशी ऊर्जा मिळालेली नाही. चांद्रयान-३ वरून अनेक इनपुट मिळाले आहेत, ज्याचा इस्रोचे शास्त्रज्ञ सखोल अभ्यास करत आहेत. गेल्या दहा दिवसांच्या आकडेवारीचेही विश्लेषण केले जात आहे. या काळात प्रज्ञान रोव्हरने १०५ मीटरची हालचाल केली आहे.

## गहू स्वस्त होणार

नवी दिल्ली : महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी केंद्र सरकारने पाऊल उचलले असून खुल्या बाजार विक्री योजनेअंतर्गत १३ ई-लिलावात १८.०९ लाख टन गहू विकला आहे. त्यामुळे गहू आणि गव्हाच्या पिठाच्या किमती कमी होण्यास मदत झाली आहे. केंद्र सरकारने ९ ऑगस्ट रोजी खुल्या बाजार विक्री योजनेअंतर्गत घाऊक ग्राहकांना अतिरिक्त ५० लाख टन गहू आणि २५ लाख टन तांदूळ विकण्याची घोषणा केली होती. साप्ताहिक ई-लिलावाद्वारे गहू २१२५ रुपये प्रति क्विंटल राखीव किमतीवर विकला जात आहे, जो सध्याच्या किमान आधारभूत किमतीच्या बरोबरीचा आहे.

## मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या भागभांडवलात भरीव वाढ करणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : महाज्योती, सारथी, बार्टी यासारख्या संस्थांच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये समानता आणण्यासाठी गठित करण्यात आलेल्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशी मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळालाही लागू करण्याचा आणि न्यायालयाचा कोणताही अडसर नसलेल्या पाच टक्के शैक्षणिक आरक्षणाच्या अंमलबजावणीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करुन निर्णय घेतला जाईल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गुरुवारी मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत सांगितले. मौलाना आझाद महामंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या कर्ज योजनांची सांगड केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या विश्वकर्मा योजनेशी घालता येईल किंवा कसे, ही बाबही महामंडळाने तपासून घ्यावी, असेही निर्देशही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी यावेळी दिले.

राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विविध समस्यांबाबत उपमुख्यमंत्री श्री. पवार यांच्या अध्यक्षतेखाली । पान २ वर

## मोदी सरकारचा लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न; महिला आरक्षणावरुन राहुल गांधींचा हल्लाबोल

नवी दिल्ली : महिला आरक्षण विधेयकाबाबत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारवर हल्लाबोल करत लक्ष वळवण्याचा प्रयत्न करत असल्याचं म्हटलं आहे. महिला आरक्षण विधेयकाबाबत काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केंद्रातील मोदी सरकारवर हल्लाबोल करत लक्ष वळवण्याचा प्रयत्न करत असल्याचं म्हटलं आहे. सरकारनं विधेयकाची अंमलबजावणी करायचीच असेल, तर आताच करावी, त्यासाठी सीमांकन कशासाठी? महिला आरक्षण विधेयकाची आजपासूनच अंमलबजावणी होऊ शकते, असं राहुल गांधी म्हणाले आहेत.



काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले की, हे विशेष अधिवेशन का बोलावलं जात आहे? हे आधी कळलं नाही, नंतर महिला आरक्षणासाठी बोलावल्याची माहिती मिळाली. महिला आरक्षण ही चांगली गोष्ट आहे, पण त्यात दोन कमतरता आहेत. सर्वात पहिली म्हणजे, आरक्षण लागू करण्यापूर्वी आपल्याला जनगणना आणि सीमांकन करावं लागेल आणि या दोन्ही गोष्टी करण्यासाठी बरीच वर्ष लागतील, असं सांगितलं जात आहे. पण सत्य हे । पान २ वर

## प्रधानमंत्री पिक विमा योजना, संयुक्त सर्वेक्षण अहवालानुसार नुकसान भरपाई

सोलापूर/प्रतिनिधीः प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०२३ अंतर्गत सोलापूर जिल्हयात माहे जूलै - ऑगस्ट मध्ये काहीं महसूल मंडळामध्ये पावसात खंड पडलेला असल्याने खरीप ज्वारी, सोयाबीन, तूर, भुईमुग, मका, बाजरी कांदा, कापूस या पिकाच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता लक्षात घेता हंगाम कालावधीत प्रतिकुल परिस्थितीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांच्या चालू वर्षीच्या अपेक्षित उत्पादनामध्ये गत ७ वर्षातील सरासरी उत्पादनाच्या तुलनेत ५० टक्केपेक्षा जास्त घट अपेक्षित असेल तर सदर अधिसुचित महसूल मंडळ / अधिसुचित तालुका पात्र राहतील व उंबरठा उत्पन्नाच्या आधारे येणाऱ्या विमा नुकसान भरपाईच्या २५ टक्के मर्यादेपर्यंत शेतकऱ्यांना आगाऊ रक्कम देण्याची तरतूद आहे. त्यानुसार पावसाचा खंड ३ ते ४ आठवडे असलेल्या अधिसूचित तालुका / मंडळामध्ये सर्वेक्षण करण्यात येऊन त्याअनुषंगाने ५० टकके पेक्षा जास्त उत्पादनात घट असलेल्या पिकांसाठी अधिसूचना निर्गमीत करण्यात आली असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.

जिल्ह्यातील उर्वरीत महसूल मंडळे / तालुक्यांमध्ये सुध्दा ३ आठवड्यांपेक्षा जास्त पावसाचा खंड पडलेला होता. यादरम्यान मध्यतंरी एखाद दुसरा दिवस अत्यंत किरकोळ प्रमाणात पाऊस पडल्यामुळे पावसाच्या खंडामध्ये तांत्रिक खंड पडलेला आहे. सदर महसूल मंडळामध्ये सुध्दा पावसाच्या खंडामुळे पिकांचे मोठ्याप्रमाणात नुकसान झालेले असून त्यामध्ये सुध्दा सरासरी उत्पादनाच्या तुलनेत ५० टक्केपेक्षा जास्त घट अपेक्षित असल्याने सदर महसूल मंडळे / तालुके यांचे सुध्दा सर्वेक्षण करुन विशेष बाब म्हणून नुकसान भरपाई देणेबाबतची मागणी होत होती. त्यानुसार जिल्हातील उर्वरीत महसुल । पान २ वर

## जेडीएसचा एनडीएमध्ये प्रवेश



नवी दिल्ली : कर्नाटकातील जनता दल सेक्युलर पक्ष शुक्रवारी अधिकृतपणे एनडीएचा भाग बनला आहे. माजी मुख्यमंत्री एच.डी. कुमारस्वामी यांनी गृहमंत्री अमित शहा आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांची भेट घेऊन याला अंतिम मंजुरी दिली आहे. याचा अर्थ आगामी २०२४ च्या निवडणुकीत जेडीएस आणि भाजप एकत्र लढणार आहेत. शहा-नड्डा यांच्यासोबत झालेल्या बैठकीत कुमारस्वामी यांच्याशिवाय गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंतही उपस्थित होते. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नड्डा यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर लिहिले की, कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री आणि जेडीएस नेते एच.डी. कुमारस्वामी यांची भाजपचे ज्येष्ठ नेते आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत भेट घेतली. जेडीएसने एनडीएचा भाग बनण्याचा निर्णय घेतल्याचा मला आनंद आहे. आम्ही त्यांचे एनडीएमध्ये मनापासून स्वागत करतो. लोकसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांनी जोरदार तयारी सुरू केली आहे. दरम्यान, कर्नाटकातून जेडीएस एनडीएमध्ये सामील झाल्याची मोठी बातमी समोर आली आहे. तुम्हाला आठवत असेल, काही दिवसांपूर्वी कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री येडियुरप्पा यांनी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपचा जनता दल (सेक्युलर) सोबत समन्वय असेल असे म्हटले होते.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी मुख्यमंत्र्यांनी घेतला पुढाकार; घरच्या गणपती बाप्पाचे केले कृत्रिम तलावात विसर्जन

ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील दीड दिवसाच्या गणेश मूर्तींचे विसर्जन बुधवारी भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले होते. यासाठी त्यांनी स्वत: कृतीशिल पुढाकार घेतला. त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी विराजमान झालेल्या दीड दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन मुख्यमंत्र्यांनी काल (२० सप्टेंबर) रोजी कृत्रिम तलावात केले. त्यांच्या या पर्यावरणपूरक कृतीचे ठाणेकरांनीही मोठ्या प्रमाणात अनुकरण केले.



महापालिका क्षेत्रात दीड दिवसांच्या १३ हजार ९५५ गणेश मूर्तींचे विसर्जन झाले. पर्यावरणाभिमुख गणेशोत्सवाची संकल्पना राबवून राज्यात पर्यावरणभिमुख गणेशोत्सवाचा आदर्श घालून देणाऱ्या ठाणे महापालिकेच्या पर्यायी गणेश विसर्जन व्यवस्थेंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावांमध्ये गणेश मूर्तींच्या विसर्जनाला भाविकांनी चांगला प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे महापालिकेच्या गणेश मूर्ती स्वीकृत केंद्रामध्ये प्राप्त झालेल्या एकूण २०२ गणेश मूर्तींचे तसेच ११ सार्वजनिक गणेश मूर्तींचे विधिवत विसर्जन करण्यात आले.

ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगर व अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी व प्रशांत रोडे यांच्या मार्गदर्शनाखाली नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा यांनी शहरात दीड दिवस, पाच दिवस आणि सार्वजनिक गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी व्यवस्था केली आहे. या व्यवस्थेंतर्गत रायलादेवी येथे दोन, आंबेघोसाळे, उपवन पालायदेवी, निळकंठ वुड्स टिकुजीनी वाडी-बाळकुम रेवाळे, खारेगाव आदी ठिकाणी एकूण १५ कृत्रिम तलावांची व्यवस्था महापालिकेने उपलब्ध करुन दिली आहे. तर पारसिक रेती बंदर अणि कोलशेत बंदर याबरोबरच मिठबंदर, कळवा, । पान २ वर



दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## ✻ सुविचार ✻

नास्तिक मनुष्य हा आस्तिक मनुष्याइतकाच धार्मिक असतो.

## संपादकीय

### अपेक्षा ठेवल्या पाहिजेत...

सगळ्यात जास्त मृत्यूचे प्रमाण रस्ता अपघात असून आत्महत्या हे मृत्यूचे दुसरे कारण मानले जाते. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्यूरोचा अपघाती मृत्यू आणि भारतातील आत्महत्या अहवाल २०२१ दाखवतो की, कोरोनादरम्यान विद्यार्थ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या होत्या आणि गेल्या पाच वर्षांत त्यात वाढ होत आहे. या रिपोर्टनुसार दर दिवसाला ३५ विद्यार्थी आत्महत्या करतात आणि आत्महत्यांचे प्रमाण २०२० च्या तुलनेत ४.५ टक्क्यांनी वाढलेले आहे. विद्यार्थी आत्महत्या का करतात? तेही ऐन तरुणाईत, जेव्हा गुलाबी स्वप्न बघून आयुष्याची खरी चव अनुभवायची असते तेव्हाच हे विद्यार्थी असा चुकीचा विचार का करतात? बऱ्याच वेळेला तरुणाईच्या आत्महत्या या परीक्षेचा निकाल लागण्याच्या वेळी किंवा परीक्षेच्या वेळी घडून येतात. एकतर जीवघेणी स्पर्धा, महत्त्वाकांक्षा, त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा यामुळे विद्यार्थी सतत दबावाखाली असतात. यातील बऱ्याचशा आत्महत्या आय.आय.टी., मेडिकल, प्रवेश परीक्षांचा अभ्यास करणारे विद्यार्थी करतात. त्यानंतर स्पर्धा परीक्षा किंवा आय.आय.टी. आणि मेडिकल यासारख्या विद्याशाखेत प्रवेश मिळाल्यानंतर तेथील अभ्यासाचे ओझे सहन न झाल्यामुळेदेखील आत्महत्या केल्या जातात. विद्यार्थी आत्महत्येमागील प्रमुख कारण असते ते म्हणजे दबाव. प्रामुख्याने जे विद्यार्थी विविध प्रवेश परीक्षांची तयारी करतात त्यांनी खूप महागड्या कोचिंग क्लासला प्रवेश घेतलेला असतो आणि त्याच्या फीचे ओझे, पालकांच्या अवास्तव अपेक्षा, कोचिंग क्लासमधील वेगवेगळ्या बॅचमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी प्रत्येक आठवड्याला घेतली जाणारी चाचणी किंवा परीक्षेचे ओझे आणि त्या परीक्षेत कमी मार्क्स मिळाले तर आपण खालच्या कमी हुशार बॅचमध्ये जाण्याची भीती, मित्रांकडून येणारा दबाव यातून विद्यार्थ्यांमध्ये ताण निर्माण होतो आणि हळूहळू हे विद्यार्थी स्वत:चा आत्मविश्वास गमावून बसतात. त्यातून नैराश्य आणि चिंता वाढायला लागते आणि विद्यार्थी आत्महत्येच्या विचारांपर्यंत पोहोचतो. पालकांनी जर पाल्याला मदत केली तर तो या मार्गाकडे न जाता योग्य शाचा मार्ग निवडू शकतो. सगळ्यात महत्त्वाची पालकांची भूमिका म्हणजे आपल्या पाल्याची बौद्धिक क्षमता ओळखून त्यानुसार त्याच्याकडून अपेक्षा ठेवल्या पाहिजेत

## शासन घरी धार्मिक उत्सव नको

भारतात अनेक धर्माचे लोक एकत्र भारतीय म्हणून राहतात. प्रत्येक धर्माला स्वतंत्र असे अस्तित्व असुन प्रत्येक धर्म आपल्याला रुढी, परंपरा, संस्कृतीचे जतन करून धर्माची उपासना करण्याचा अधिकार हा भारतीय संविधानाने दिलेला आहे. कायद्या समोर कोणताही धर्म लहान वा कोणताही धर्म मोठा नाही. थोडक्यात भारत हा धर्म निरपेक्ष देश आहे. धर्म हि खाजगी बाब आहे व धर्माचे पालन आपण आपल्या वैयक्तिक जिवनात करू शकतो. सार्वजनिक ठिकाणी किंवा शासकीय पातळीवर कोणत्याही धर्माला महत्त्व न देता माणसाला महत्त्व देऊन त्याची भारतीय म्हणून ओळख आहे. परंतु स्वत: ला सुशिक्षित समजणारे आणि शासकीय व निमशासकीय अशा ठिकाणी काम करणारे लोक धार्मिकता आणून वातावरण दुषीत करण्याचा प्रयत्न करतात. आणि हल्ली ते प्रमाण वाढले आहे. सत्य व अंधविश्वास, पांखड, थोतांड व वैज्ञानिक बोलले तर येथे लोकांना मिर्ची लागते. परंतु अज्ञानात राहुन अंधविश्वास, पाखंड, असत्य यावर विश्वास ठेऊन बोलले तर त्या व्यक्तीला चांगले माणले जाते. कोणी कोणत्या धर्माचे पालन करावे हा सर्वस्वी वैयक्तिक प्रश्न असताना त्या धार्मिक बाबीला सार्वजनिक किंवा शासकीय निमशासकीय पातळीवर आणणे हे चुकिचे आहे. प्रत्येक धर्मानुसार एखाद्या तरी सन उत्सव किंवा विधी हा उच्च असतो. आणि तो सन उत्सव त्या धर्मातील लोक मोठ्या उत्साहाने साजरे करतात. परंतु जे सन उत्सव घरात साजरे करायचे ते शासकीय निमशासकीय ठिकाणी सुरू केले प्रश्न निर्माण होणार. कारण शासकीय निमशासकीय कार्यालय व संस्था येथे संविधान लागु असते. संविधानाने दिलेली ओळख भारतीय म्हणून आहे. धर्माच्या आधारे कोणत्याही व्यक्तीला ओळख दिली नाही. म्हणुन नोकरी करणारे अर्थात बुद्धिमान लोक असतात या लोकांना किमान धार्मिक सन उत्सव शासकीय कार्यालय संस्थेत साजरा करू नये हे ही कळत नसेल तर त्या बुद्धीचा फायदा नेमका आहे तरी काय? प्रत्येक धर्माची विचारधारा वेगळी आहे. काही विचारावर धार्मिक मतभेद आहेत याचाच अर्थ धार्मिक सन उत्सव शासकीय व निमशासकीय कार्यालय व संस्थेमध्ये साजरे झाले तर लोक प्रश्न विचारणारच कारण शासकीय व निमशासकीय संपत्ती ही तेथे काम करणाऱ्या अधिकारी कर्मचारी यांची नसुन जनतेची आहे धर्माची ही नाही. म्हणून धार्मिक विधी शासकीय कार्यालय व संस्थेत साजरा करणे म्हणजे आपल्या धर्मातील चालिरीती जबरदस्ती इतरांवर थोपवने होय. असे कृत्य केल्यानेच धार्मिक टिका टिप्पणी होत असते. एकिकडे गणपती, दहिहंडी, सत्यनारायण, लक्ष्मी पुजन केले जाते. हे फक्त हिंदु धर्मातील काहीच लोक माणतात परंतु जे मानत नाहीत किंवा मुस्लिम ख्रिश्चन, जैन, बौद्ध या धर्मातील लोक वरिल गोष्टींना मान्यता देत नाहीत मग इतर धर्माचे विचार तुडवून आपलाच धर्म लादणे हे चुकीचे आहे. शिकलेल्या व नोकरी करणाऱ्या लोकांना आपण शासकीय ठिकाणी धार्मिक पुजा अर्चा किंवा सन उत्सव साजरे करू नये याने वाद निर्माण होऊ शकतात हेही शासकीय कर्मचारी अधिकारी यांना समजत नसेल तर आपण किती धर्मांध आहोत हे लक्षात येते. शासकीय कार्यालयामध्ये धर्मांधता वाढून कोणत्याही धार्मिक पद्धतीने सन उत्सव किंवा विधीने कोणतेही काम होऊ नये हे तर नैतिकतेचा विषय आहे. परंतु नैतिकता विसरून लोक धार्मिक विधी, सन उत्सव शासकीय कार्यलय किंवा संस्थेत करत होते म्हणून सरकारला पत्रच काढावे लागले. सर्व सामान्य लोकांचे काम करताना शासकीय अधिकारी नियम दाखवतात परंतु धार्मिक सन उत्सव शासकीय निमशासकीय संस्थेत साजरा करताना नियम धाब्यावर बसतात यालाच प्रामाणिक पणा म्हणायचे हा प्रश्न आहे. देवी देवतांचे फोटो शासकीय कार्यालयात लाऊ नये व धार्मिक सन उत्सव साजरे करू नये अशा आशयाचे पत्र सरकारने ने २००२ ला काढल्याचा उल्लेख अनेक ठिकाणी आहे. त्या पत्राची अंमलबजावणी होत नाही व शासकीय कार्यालयात धार्मीकता वाढून धर्मनिरपेक्षेला तडा जात आहे असे पुन्हा दिसले तेव्हा पुन्हा ४ जानेवारी २०१७ रोजी ग्राम व जलसंधारण विभागाने पत्र काढून देवदेवतांचे फोटो व धार्मिक पद्धतीने पुजा अर्चा, सत्यनारायण सारखी क्रीया करण्यावर बंदी घातली. शासकीय पत्राचा आधार घेऊनच नाशिकचे तत्कालीन आयुष्य व कायद्याचे पालन करणारे अधिकारी म्हणजे तुकाराम मुंढे यांनी नाशिक महानगरपालिका क्षेत्रात शासकीय व निमशासकीय कार्यालयात देवी देवतांचे फोटो व धार्मिक विधी करणाऱ्यावंर कार्यवाही केली होती. याचा अर्थ शासकीय अधिकारी कर्मचारी फक्त नियम सर्वसामान्य लोकांना सांगतात स्वत: मात्र त्याचे उलंघन करतात. आणि हे उलंघन केवळ धर्माच्या नावासाठी अंधविश्वास जोपासण्यासाठी असेल तर देशासाठी खुप घातक आहे. शासनाच्या नियमांचे पालन न करता धार्मिक सन उत्सव शासकीय ठिकाणी साजरे करणाऱ्या लोकांच्या मनात देश व जनता यांच्या साठी आपुलकी नसते हेच सिद्ध होते.धर्म आणि विचारधारा हा खुप मोठा व चर्चेचा विषय आहे. परंतु अनेक लोक म्हणतात केवळ हिंदु धर्मावरच लोक का बोलतात हिंदु धर्मावरच टिका का करतात. तर याचे एकमेव उत्तर आहे धर्म हि खाजगी बाब आहे ती वैयक्तिक पातळीवर वापरणे गरजेचे आहे. शासकीय किंवा सार्वजनिक पातळीवर आणली तर टिका टिप्पणी होणारच. शासकीय ठिकाणी गणेशोत्सव, लक्ष्मी पुजन करणारे लोक इदच्या दिवशी नमाज पठण करतात का? स्वत: चा बाबु आणि दुसऱ्याच ते कारटं हि मानसिकता मोडीत काढून शासकीय कर्मचारी अधिकारी समजदार व बुद्धिमान असतात हे त्यांनी त्यांच्या वर्तनातुन सिद्ध करावे. शासनाचे पत्र असुनही जर शासनाचे च शासकीय कर्मचारी ऐकत नसतील तर शासकीय कर्मचारी व अधिकारी यांच्या कडे सर्वसामान्य लोकांनी कोणत्या नजरेमधुन बघावे? सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतील अनेक लोक धर्माच्या नावाखाली अंधविश्वास, पाखंड, थोतांड जोपासतात जे विज्ञान व माणुसकी आणि तर्काला धरून नसते. अशा गोष्टी शासकीय पातळीवर होऊ नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. शासकीय व निमशासकीय ठिकाणी काय करू नये या संदर्भात पत्र काढुनही कर्मचारी व अधिकारी यांना कदाचित पत्रातील मजकूर कळाला नसेल म्हणुन ३१ डिसेंबर २०२१ रोजी सामान्य प्रशासन महाराष्ट्र शासनाने एक पत्र पुन्हा काढले आणि त्यामध्ये यादीच दिली. शासकीय व निमशासकीय कार्यालयात यादीत समाविष्ट असलेलेल्याच गोष्टी तुम्ही शासकीय पातळीवर साजऱ्या करा. त्या यादीमध्ये गणेशोत्सव, दहिहंडी सत्यनारायण लक्ष्मी पुजन असा कोणताही उल्लेख नाही तरीही गणेशोत्सव, दहिहंडी किंवा इतर धार्मिक सन उत्सव शासकीय ठिकाणी साजरे होत असतील तर हा बदमाश पणा नाही तर काय आहे? शासकीय पातळीवर महापुरूषांच्या जयंती कार्यक्रम साजरे करण्याचे आदेश असुनही बऱ्याच शासकीय कर्मचाऱ्यांना महापुरुष हे जातीचे वाटतात. धार्मिक सन उत्सव हे सार्वजनिक वाटतात. महापुरूषांच्या जयंती कार्यक्रम सार्वजनिक साजरे व्हायला पाहिजे आणि धार्मिक सन उत्सव हे वैयक्तिक वा खाजगी पातळीवर साजरे होणे गरजचे असून देशातील बरेच शासकीय कर्मचारी मानसिक गुलाम असल्याने सत्याचा स्विकार न करता काल्पनिक बाबींना सत्य मानतात व सत्य बाबींचा स्विकार करत नाहीत. यामुळे देशात धर्मांधता वाढत आहे. शासकीय पातळीवर धार्मिक सन उत्सव साजरा करणे हे कायदेशीर व नैतिक दोन्ही दृष्टीने चुकिचे आहे तरीही साजरे केले जातात. सध्या गणेशोत्सव बहुतांश शासकीय कार्यलय व संस्थेत साजरा केला जातो. परंतु मुस्लिम लोक मुर्तीपुजा मानत नाहीत, बौद्ध लोक नास्तिक आहेत, जैन लोक महाविर यांना तर ख्रिश्चन लोक केवळ येशुला माणतात मग शासकीय ठिकाणी गणेशोत्सव साजरा करणे म्हणजे इतर धर्माची मुस्कटदाबी नाही का? मुळात प्रश्न हाच आहे की धर्म कोणताही असो कायद्यासमोर सर्व सारखे आहेत.. आणि कोणत्याही धर्मातील लोकांना पुजा, उपासना करण्याचा अधिकार आहे म्हणून सार्वजनिक ठिकाणी धर्म विषयावरुन वाद होणार नाही म्हणून नैतिक दृष्टीने व शासकीय दृष्टीने आवश्यक आहे. सरकारी कर्मचारी अधिकारी हे जनतेचे सेवक व सरकारचे प्रतिनिधी असतात. म्हणून त्यांनी कार्यालयात वागतानाही सुद्धा कोणत्याही धर्माची प्रत्यक्ष दर्शी ओळख होईल असे वागु नये. कार्यालयीन वेळ संपल्यावर प्रत्येक जन आपल्याला धर्मानुसार काहीही करायला स्वतंत्र आहे. परंतु हे करतानाही सुशिक्षीत असणाऱ्यांनी

अंधविश्वास, पाखंड, भोंदुगीरी थोतांड याचा संबध धर्माशी जोडू नये. उठसूट कोणत्याही बाबी धर्माशी जोडून वैचारिक दृष्टीने गुलाम व धार्मिक दृष्टीने अंध बनवण्याचा प्रयत्न सुरू आहे तो विषय जरी वेगळा असेल तरीही धार्मिक सन उत्सव कोणत्याही धर्माचे हे शासकीय पातळीवर, शासकीय कार्यालये, संस्था येथे साजरे करणे चुकिचेच आहे. अपेक्षा आहे स्वत: ला सुशिक्षित व समजदार समजणारा नोकरदार वर्ग काही गोष्टी नैतिक व शासकीय पातळीवर समजून घेतील. व भविष्यात शासकीय कार्यालय व संस्थेतून धर्मांधता बाहेर पडेल हिच अपेक्षा..

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## भारताचा ऑस्ट्रेलियावर पाच विकेटने

गायकवाड यांनी १४२ धावांची दमदार सलामी दिली. ऋतुराज आणि गिल यांनी सुरुवातीपासूनच ऑस्ट्रेलियाचा समाचार घेतला. दोघांनीही अर्धशतके पूर्ण केली. भारत सहज सामना जिंकेल असे वाटत होते. पण त्याचवेळी अॅडम जम्पा याने ऋतुराज गायकवाड याला तंबूत पाठवला. ऋतुराज गायकवाड याने ७७ चेंडूत ७१ धावांची खेळी केली. या खेळीत ऋतुराजने दहा चौकार मारले. ऋतुराज बाद झाल्यानंतर श्रेयस अय्यर लगेच धावबाद झाला. त्यानंतर शुभमन गिल याला झम्पा याने तंबूत पाठवले. शुभमन गिल याने ६३ चेंडूत ७४ धावांची खेळी केली. यामध्ये सहा चौकार आणि दोन षटकारांचा समावेश होता. दहा धावांत भारताने तीन विकेट लागोपाठ गमावल्यामुळे भारतीय संघ अडचणीत सापडला होता. त्यानंतर इशान किशन आणि केएल राहुल यांनी भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण पॅट कमिन्स याने जोडी फोडली. इशान किशन याला १८ धांवावर कमिन्सने बाद केले.

किशन बाद झाल्यानंतर केएल राहुल आणि सूर्या यांनी ऑस्ट्रेलियाचा समाचार घेतला. सुरुवातीला संयमी फलंदाजी केली. एकेरी दुहेरी धावसंख्यावर भर दिला. पण त्यानंतर चौकार-षटकार ठोकले. सूर्यकुमार यादव याने दमदार अर्धशतक ठोकले. सूर्यकुमार आणि केएल राहुल यांच्यामध्ये ८० धावांची भागिदारी झाली. सूर्यकुमार यादवने पाच चौकार आणि एका षटकारांच्या मदतीने ५० धावांची खेळी केली. सूर्या बाद झाल्यानंतर केएल राहुलने फिनिशिंग टच दिला. केएल राहुलने कर्णधाराला साजेशी खेळी केली. केएल राहुलन ६३ चेंडूत नाबाद ५८ धावांची खेळी केली. यामध्ये एक षटकार आणि चार चौकारांचा समावेश आहे. ऑस्ट्रेलियाकडून अॅडम झम्पा याने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. त्यासिवाय सीन एबॉट आणि पॅट कमिन्स यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.

## मोदी सरकारचा लक्ष विचलित..

आहे की, महिला आरक्षण विधेयक आजपासून लागू केलं जाऊ शकतं.

लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के जागा दिल्या जाऊ शकतात. पण सरकारला तसं करायचं नाही. सरकारनं विधेयक मंजूर केलं आहे, पण प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी १० वर्षांनी होणार आहे. एवढंच नाहीतर, ते होणार की नाही हे देखील माहीत नाही.

ओबीसींना आरक्षण देण्याची मागणी करताना राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान म्हणतात की, ते ओबीसींसाठी खूप काम करत आहेत. खरंच मोदी ओबीसींसाठी एवढं काम करत असतील तर ९० पैकी तीनच लोक ओबीसी समाजातील का? भारताच्या बजेटच्या फक्त ५ टक्के भाग ओबीसी कंट्रोल करत आहेत. भारतातील ओबीसी लोकसंख्या ५ टक्के आहे का? असा प्रश्न मी संसदेत विचारला असता त्यांनी उत्तर दिलं की, लोकसभेत आमचे प्रतिनिधी आहेत, पण याचा त्याचा काय संबंध?

ओबीसींचा मुद्दा उपस्थित करत राहुल गांधी म्हणाले की, अधिकाऱ्यांचे नियंत्रण असलेल्या अर्थसंकल्पापैकी केवळ ५ टक्के ओबीसींचंच बजेट आहे. एकदा मी ठरवलं की मी ते सोडत नाही. मला हे शोधायचं आहे की, भारतात किती टक्के ओबीसी आहेत, खरंच ते फक्त पाच टक्के आहेत का? असेल तर ठीक आहे, नाहीतर सरकारनं सांगावं की, किती आहेत?

## प्रधानमंत्री पिक विमा योजना,

मंडळे /तालुक्यामध्ये पिकांच्या नुकसानीबाबत संयुक्त सर्वेक्षण करण्यात येणार असुन यामध्ये बार्शी तालुक्यातील बार्शी ब खांडवी,सांगोला तालुक्यातील सांगोला,हतीद,सोनंद,नाझरा व संगेवाडी ,मंगळवेढा तालुक्यातील बोराळे,मरबडे व भोसे, मोहोळ तालुकयातील पेनुर व मोहोळ,करमाळा तालुक्यातील जेऊर व उमरड, पंढरपूर तालुक्यातील भंडीशेगाव , माळशिरस तालुकयातील महाळुंग व पिलीव या मंडळांचा तसेच बार्शी, सांगोला व मंगळवेढा या अधिसुचित तालुक्यांचा समावेश आहे. संयुक्त सर्वेक्षण अहवालानुसार अधिसुचित पिकांची उत्पादकता मागील सात वर्षाच्या सरासरी उत्पादनाच्या तुलनेत ५० टक्के पेक्षा कमी आल्यास महसुल मंडळे /तालुक्यातील सुमारे एक लाख शेतक-यांना पिक विमा योजनेतील तरतुदीनुसार नुकसान भरपाई देण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

## मौलाना आझाद आर्थिक विकास..

आढावा बैठक त्यांच्या मंत्रालयातील दालनात गुरुवारी झाली. यावेळी अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, महाराष्ट्र वक्फ बोर्डाचे अध्यक्ष डॉ. वजाहत मिर्झा, संजय खोडके, हाफेज मोहम्मद नदीम सिध्दिकी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ.राजगोपाल देवरा, सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन गद्रे, कौशल्य विकास, उद्योजकता, नगरविकास, अल्पसंख्याक विकास विभाग, ग्रामविकास, नियोजन, शालेय शिक्षण, विधी व न्याय, पाणीपुरवठा व स्वच्छता, सामाजिक न्याय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, या विभागाचे सचिव हे प्रत्यक्ष तर छत्रपती संभाजीनगर व सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते.

या बैठकीत मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या भाग भांडवलामध्ये वाढ करणे व शासनाने द्यावयाच्या हमी संदर्भात देखील चर्चा करण्यात आली. महामंडळाचे सध्याचे भाग भांडवल ७०० कोटी रुपये असून ते टप्प्या-टप्प्याने एक हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्यात येईल, शासनाने तीस कोटी रुपयांची कर्ज हमी दिलेली आहे, त्यात देखील वाढ करुन ती टप्प्या-टप्प्याने पाचशे कोटी रुपयांपर्यंत नेण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी स्पष्ट केले.

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून गरजूंना देण्यात येणाऱ्या कर्जासाठी असलेल्या अटींचा पुनर्विचार करुन नव्याने अटी व शर्ती निश्चित कराव्यात, अशाही सूचना श्री. पवार यांनी महामंडळाला दिल्या.

मागासवर्गीय मुस्लिम अल्पसंख्याकांसाठी सामाजिक तसेच शैक्षणिक आरक्षण देण्याच्या बाबतीत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा करून किमान शैक्षणिक आरक्षण कसे देता येईल, हे बघू, असे श्री. पवार यांनी आश्वासित केले. याशिवाय मागासवर्गीय मुस्लिम अल्पसंख्याकांसाठी विशेष पॅकेज देण्याबाबतीतही यावेळी बैठकीत चर्चा करण्यात आली.

वक्फ मिळकतीसंबंधी महाराष्ट्र राज्यातील गाव नमुना नंबर ७/१२ च्या उताऱ्यावर तसेच नागरी भागातील वक्फ मिळकतीच्या अधिकार अभिलेखांमध्ये केवळ संबंधित वक्फ संस्थेच्या नावाची नोंद घेणे व इतर वक्फ सदरी वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार अशी नोंद घेणेबाबत सर्वसमावेशक सूचना शासनाचे सर्व जुने शासन निर्णय अधिक्रमित करून राज्यातील वक्फ संस्थांच्या जमिनीच्याबाबत अधिकार अभिलेखात वक्फ संस्थांचे नाव घेऊन इतर वक्फ सदरी वक्फ प्रतिबंधित सत्ता प्रकार व कायदेशीर वारसांची नोंद घेण्याबाबत नवीन शासन निर्णय निर्गमित करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. या विषयामधील सर्व कायदेशीर बाबी तपासण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करावी,

या समितीत अल्पसंख्याक विभागाच्या सचिव, उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, वक्फ बोर्डाचे सदस्य सचिव यांचा समावेश करावा, बैठकीत झालेल्या चर्चेनुसार ७/१२ वर अगोदर वक्फ बोर्ड, त्यानंतर ट्रस्ट आणि इतर अधिकारात मुतलकी यांचे नाव घेता येईल का, हेही तपासावे, कोणत्याही परिस्थितीत मालमत्तेची मालकी वक्फ बोर्डाकडेच राहिली पाहिजे, असेही निर्देश श्री. पवार यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य वक्फ महामंडळाच्या अधिपत्याखाली असलेल्या वक्फ संस्थाकडून वक्फ फंड, विलंब शुल्क, ऑडिट फी, जीएसटी घेतला जातो, ही रक्कम जास्त असल्याने कमी करावी, अशाप्रकारची मागणी जमियत-ए-उलमा हिंद यांच्याकडून करण्यात आली होती. विलंब शुल्क व व ऑडिट फी कमी करुन विलंब शुल्क १ हजार रुपयांऐवजी ५०० रुपये, ऑडिट फी ५०० रुपयांऐवजी २०० रुपये, २ हजार रुपयांऐवजी ५०० रुपये आणि ५ हजार रुपयांऐवजी १ हजार रुपये आकारण्यात यावेत, असा निर्णय तत्काळ घेत असल्याचे उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी जाहीर केले.

छत्रपती संभाजीनगर येथील हज हाऊस तातडीने सुरु करण्याबाबत निर्णय झाला असून त्याचे लवकरच उद्घाटन केले जाईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

छत्रपती संभाजीनगर येथील वक्फ बोर्डाची जागा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ताब्यात ठेवली असून ती बोर्डाला परत मिळाली पाहिजे, या मागणीबाबत चर्चा करण्यात आली, यासंदर्भात देखील अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांच्या समितीने योग्य तोडगा काढावा, अशा सूचना श्री. पवार यांनी दिल्या.

सोलापूर शहर येथील शैक्षणिक व खेळासाठी आरक्षित असलेल्या शासकीय भूखंडाची मागणी जमियत - उलमा-ए-महाराष्ट्र या संस्थेने केली आहे. या भुखंडासाठी आणखीही काही अल्पसंख्याक संस्थांनी अर्ज केला असल्याची बाब अतिरिक्त मुख्य सचिव (महसूल) यांनी निदर्शनास आणून दिली.

शासनाच्या नियमानुसार संस्थेची पात्रता, भूखंडावर विकास करण्याची संस्थेची आर्थिक क्षमता, संस्थेचे कार्य या बाबी तपासूनच सुयोग्य संस्थेला भूखंड वितरित करण्याचा निर्णय लवकरात लवकर महसूल विभागाने घ्यावा, असेही उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी सांगितले.

राज्यात जिल्हा परिषद नगरपालिका व महानगरपालिका अंतर्गत उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये रिक्त असलेली पदे भरण्याबाबत, उर्दू शिक्षक भरतीसाठी बिंदू नामावलीनुसार आरक्षित जागांवर उमेदवार उपलब्ध न मिळाल्यास ती जागा खुल्या प्रवर्गातून भरण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. आरक्षणातील उमेदवार न मिळाल्यास खुल्या प्रवर्गातून पदे भरावीत, अशा प्रकारचा शासन निर्णय असल्याची बाब सामाजिक

न्याय विभागाच्या सचिवांनी निदर्शनास आणून दिली. उर्दू शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून ही पदे तातडीने भरण्याबाबत महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांना तातडीने कळवावे, असेही निर्देश उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिले.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी

गायमुख आदी सात ठिकाणी विसर्जन महाघाट निर्माण केले आहेत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मासुंदा तलाव येथील दत्तघाट येथेही पर्यायी विसर्जन व्यवस्था करण्यात आली आहे. त्याशिवाय मासुंदा तलावाच्या अहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यालगत असलेल्या घाटावर ही गणेश मूर्ती स्वीकारण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर, महापालिका क्षेत्रात एकूण ४२ ठिकाणी विसर्जनासाठी विशेष टाकी व्यवस्था तयार करण्यात आली आहे.

ठाणे महापालिकेने गणेशमूर्ती विसर्जनासाठी उपलब्ध करुन दिलेल्या सुविधा व तेथे विसर्जित करण्यात आलेल्या गणेशमूर्तींची संख्या पुढीलप्रमाणे - विसर्जन घाट (०७) - ११ हजार ९१० गणेश मूर्ती, कृत्रिम तलाव (१५) - ९६८ गणेश मूर्ती, विशेष टाकी व्यवस्था (४२) - १ हजार ७७ गणेश मूर्ती, अशा एकूण १३ हजार ९५५ गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेची पंढरपूर शहरातून भव्य मिरवणूक

पंढरपूर/प्रतिनिधीः 'पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या एकशे छत्तीसाव्या जयंतीनिमित्त येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय व यशवंत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक पंढरपूर शहरातून फुलांनी सजवलेल्या रथातून ढोल ताशाच्या निनादात काढण्यात आली. या मिरवणूकीच्या सुरुवातीस रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अमरजीत पाटील, प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, चेअरमन अभिजित पाटील, बाळासाहेब नेहतराव, सुभाष भोसले, डॉ. दादासाहेब साळुंखे, अप्पासाहेब पाटील, डॉ. राजेंद्र जाधव, जगन्नाथ भायगुडे, उपप्राचार्य डॉ. बजरंग शितोळे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य राजेंद्र कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, मुख्याध्यापक सौ. अनिता साळवे व पर्यवेक्षक युवराज आवताडे आदी



मान्यवरांनी महाविद्यालयातील कर्मवीरांच्या पुतळ्यास पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले.'

या मिरवणूकीस महाविद्यालयातून प्रारंभ होवून पुढे ही मिरवणूक कर्मवीर पथ, सरगम चौक, इंदिरा गांधी चौक, नवी पेठ, अर्बन बँक, भादुले चौक, नगरपालिका, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सावरकर चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, ग्रामीण पोलीस स्टेशन, मार्केट यार्ड या मार्गाने महाविद्यालयात आली. या मिरवणूकीत विद्यार्थिनीचे झांज पथक, टिपरी नृत्य पथक आणि छत्रपती शिवाजी महाराज व अफजल खान भेटीचा जिवंत देखावा हे खास आकर्षण ठरले. या मिरवणुकीत कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचार आणि कार्याच्या विषयी माहिती देणारे फलक विद्यार्थ्यांनी घेतले होते. शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या घोषणा सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी दिल्या. यावेळी प्रा. डॉ. अमर कांबळे, प्रा. सुमन केंद्रे, प्रा. डॉ. भारती सुडके, प्रा. कुबेर गायकवाड यांनी निवेदन केले.

या मिरवणुकीत राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, कमवा व शिका योजना, सिनिअर, ज्युनिअर, व्यवसाय अभ्यासक्रम विभाग आदी विभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी बहुसंख्येने सहभागी झाले होते.या मिरवणुकी वेळी पंढरपूर शहरातील रयत शिक्षण संस्था प्रेमी नागरिक, माजी विद्यार्थी, राजकीय नेते आणि व्यापारी यांनी कर्मवीरांच्या प्रतिमेस अभिवादन केले. ही मिरवणूक यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्तात्रय चौधरी, राष्ट्रीय छात्र सेना लेफ्टनंट प्रा. डॉ. समाधान माने, प्रा. डॉ. सुशीलकुमार शिंदे, प्रसिद्धी प्रमुख डॉ. दत्ता डांगे, प्रा. दत्ता खिलारे, कार्यालयीन प्रमुख प्रभाकर पारधी, अभिजित जाधव, सुरेश मोहिते यांनी विशेष परिश्रम घेतले.




# महाराष्ट्राच्या मराठमोळी परंपरा सांगितिक मेजवाणी पंढरपूरकर कलारसिकांचा प्रतिसाद

## गायन वादन आणि नृत्य तिन्हीं कलेचा संगम कलारसिकांनी अनुभवला

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर आयोजित श्री गणेशोत्सव संगीत महोत्सव सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर , कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली दुसरं पुष्प गुंफताना सदस्या शकुंतला नडगिरे मॅडम ,उदय साटम, ज्योती साटम, दर्शन साटम,जयेश निकम यांच्या शुभहस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.

*सुरुवातीला गणेश वंदना गाऊन श्रीगणेशाला नमन करत गायक दर्शन साटम,संगेश पवार,शुभमं मस्के, श्रध्दा साळवी, उमा गावंड,व्यवस्थापक जयेश निकम नृत्य दिग्दर्शक संदीप कांबळे, यांच्या सुमधुर गायनाने वादनाने आणि नृत्याने कलारसिक चिंब होत पहाटेची भूपाळी, कानडा राजा पंढरीचा,दळीते दळण, उजळून आलं आभाळ,मराठी पाऊल पडते पुढे, ढगाला लागली कळ,बाई मी केळी वाली, तुझ्या रुपाच चांदणं,झिंगाट,जय जय महाराष्ट्र माझा,आईचा गोंधळ, पोवाडे,अशा विविध महाराष्ट्राची ओळख सांगणाऱ्या मराठमोळ्या कार्यक्रमाला पंढरपूर कलारसिकांनी ही तितकाच उत्साहात प्रतिसाद दिला,या सुंदर अशा मराठमोळी परंपरा कार्यक्रमाला साथसंगत ही तितकीच अप्रतिम आणि दमदार होती, शेवटपर्यंत उपस्थित कलारसिकांनी दाद देत गायन वादन नृत्य सांस्कृतिक मेजवानीचा आनंद घेतला, गणेशोत्सव संगीत महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती कर्मचारी वर्ग आदी अधिक परिश्रम घेत आहेत, उद्या शुक्रवार रोजी विजयकुमार बनसोडे यांचे शास्त्रीय गायन व शनिवार रोजी ख्यातनाम अभिनेत्री आणि नृत्यांगना शर्वरी जेमनिस यांच्या कथ्थकरंग हा नृत्याविष्कार पाहण्यासाठी सर्व पंढरपूरकर कलारसिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर यांचे वतीने करण्यात येत आहे

# लसीकरण व गोठ्याची स्वच्छता याद्वारे लम्पी आजार रोखू शकतो : सहाय्यक आयुक्त डॉ.सत्यवान भिंगारे

## स्वेरीत 'लम्पी जनजागृती अभियान' संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः 'सध्या गाय, म्हैस अशा दुभत्या जनावरांमध्ये लम्पी हा गंभीर आजार होत आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग व पशुपालक चिंतेत दिसत आहेत. गुरांना ताप येणे, त्वचेवर आणि श्लेष्मल त्वचेवर वाढलेले वरवरचे फोड



आणि एकापेक्षा जास्त गाठी ही या रोगाची लक्षणे आहेत. संक्रमित गुरांच्या पायांवर सूज येते आणि जनावर लंगडते. वास्तविक पाहता शंभर टक्के लसीकरण व गोठ्याची स्वच्छता सातत्याने केल्यास पशुमध्ये होणारा लम्पी हा आजार आपण रोखू शकतो.' असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. सत्यवान भिंगारे यांनी केले.

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन व जेष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान, पंढरपूरद्वारा आयोजित 'लम्पी जनजागरण अभियान' अंतर्गत स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये आयोजिलेल्या या उपक्रमात सहाय्यक आयुक्त डॉ. सत्यवान भिंगारे हे मार्गदर्शन करत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे हे होते. व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे, पशुधन विकास अधिकारी डॉ. विजय कोळेकर, पशुपालक हणमंत सुरवसे, भंडीशेगावचे विठ्ठल आलेराव आदी तसेच पशुधन पर्यवेक्षक अनिल शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविकामध्ये डॉ. विश्वासराव मोरे यांनी लम्पी आजाराबाबत पशुपालकांची भिती दूर करून व त्या संदर्भात शास्त्रोक्त माहिती दिली. आजारावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने विद्यार्थी व पशुपालकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी आत्तापर्यंत रयत शिक्षण संस्था (रोपळे), मातोश्री सरुबाई माने प्रशाला (भटुंबरे), वामनराव माने प्रशाला (भैरवनाथ वाडी), लोकमान्य प्रशाला (पंढरपूर), यशवंत विद्यालय (भोसे), विठ्ठल प्रशाला (गुरसाळे) या व इतर ठिकाणी जवळपास सात हजार विद्यार्थी व पशुपालकांना आवश्यक माहिती देण्यात आल्याचे सांगितले. पुढे त्यांनी आणखी काही विद्यालये, कनिष्ठ महाविद्यालये यामधून लम्पी आजाराबाबत जनजागृती अभियान घेणार असल्याचे सांगितले. डॉ.भिंगारे यांनी लम्पी आजाराची कारणे, लक्षणे व आजार नियंत्रित ठेवण्यासाठी ८० टक्के सुश्रूता व २० टक्के उपचाराची गरज असल्याचे सांगितले.

अध्यक्षपदावरून बोलताना स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे म्हणाले की, 'अशा आजारामध्ये महत्वाची जबाबदारी ही प्रामुख्याने पशुपालकांची असून त्यांनी वरिष्ठ पशुपालकांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दक्षता घेतल्यास व शुश्रूता केल्यास कोविड महामारी प्रमाणे पशू मध्ये आढळणारा हा लम्पी आजार नियंत्रणात येऊ शकतो. या आजारावरची लस लवकरच शासन संशोधित करेल.' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या जनजागृती कार्यक्रमास ५०० हून अधिक भावी अभियंते व सध्या पशूपालक असलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विजय कोळेकर यांनी केले तर तुंगत येथील पशुधन पर्यवेक्षक अनिल शिंदे यांनी आभार मानले.

# अवैध वाळू वाहतूकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

## कटरच्या साहाय्याने ९ होड्या निकामी



पंढरपूर/प्रतिनिधीः अवैध वाळू उपसा व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली असून, इसबावी येथील भीमा नदीपात्रात अवैध वाळू वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ९ होड्या कटरच्या सहाय्याने नष्ट करण्यात आल्याची माहिती तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी दिली.पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी गजानन गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी पथकाची नेमणूक केली आहे.

इसबावी हद्दीतील सांगोला पाणी पुरवठा योजना व पंढरपूर न.पा पाणी पुरवठा योजना येथील भीमा नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या ९ लाकडी होड्या महसूल पथकाच्या निदर्शनास आल्या. संबधित ठिकाणी पथकाने तत्काळ कारवाई करुन होड्या कटरच्या सहाय्याने पुर्णपणे नष्ट केल्या. या पथकात तहसलिदार सुशिल बेल्हेकर, मंडळ अधिकारी रिगन चव्हाण, तलाठी कैलास घुसिंगे, निलेश कुंभार, समाधान शिंदे , दत्ता कोताळकर ,राजेंद्र वाघमारे लिपिक विजय झोरे सहभागी होते.

# पेरियार ई. व्ही. रामासामी यांच्या जयंती निमित्त प्रबोधनात्मक कार्यशाळा

छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना, जनतेला जागृत करण्यासाठी १७ सप्टेंबर २०२३ ला पेरियार ई. व्ही. रामासामी यांची १४४ वी जयंती. पेरियार ई. व्ही. रामासामी यांचा जन्म १७ सप्टेंबर १८७९ ला मद्रास प्रांतातील ईरोडू या गांवी व्यापारी कुटुंबात झाला होता. त्यांनी आपले संपूर्ण जीवन सामाजिक क्रांतीसाठी वेचले होते. ही प्रासंगिकता लक्षात घेऊन त्यांच्या जयंती निमित्त या ज्वलंत विषयावर बामसेफ अंतर्गत फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने जनसंपर्क कार्यालय द्वारा बी. बी. मेश्राम, साकेत नगर (पेठे नगर), छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जेणेकरून फुले शाहू आंबेडकराईट चळवळीचे संघटनात्मक कार्यात वृद्धी होऊ शकेल.




या कार्यशाळेचे उदघाटन इंजिनीअर अनंत कुमार खोब्रागडे यांनी केले. ते म्हणाले की, देशासमोर अनेक समस्या आ-वासून उभ्या असताना पेरियारांनी मात्र काँग्रेसचे उच्चाटन करने हे ध्येय अंगिकारले होते. काँग्रेसमुळे देशात ब्राह्मणशाही मजबूत होऊन लोकशाहीला खीळ बसते, असे त्यांचे स्पष्ट मत होते. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा काँग्रेस हे जळते घर आहे, असे म्हटले होते. यामागील नेमके काय गौडबंगाल आहे? हे आपण या निमित्ताने समजून घेणे आवश्यक आहे. सत्तेपुढे शहाणपण टिकत नसते. म्हणून शहाण्यांची सत्ता आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. याप्रसंगी सुधाकर दांडगे म्हणाले की, ते दक्षिण भारतीय आंबेडकरच होते. ते नास्तिक होते. त्यांनी अंधश्रद्धा एक असे रसायन आहे जे व्यक्तीला मूर्ख बनविते, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले होते. वायकोम सत्याग्रहामुळे त्यांना तुरुंगवास पण झाला होता. हिरामण अहिरे म्हणाले की, संघटन चालविण्यासाठी वेळ, बुद्धी आणि आर्थिक पाठबळ दिले पाहिजे. अँड. विलास रामटेके म्हणाले की, न्यायालयाने बंदी उठवलेल्या 'सच्ची रामायण' या पुस्तकात नेमके काय म्हटले आहे? ते आपण समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे. पांडुरंग वाकळे म्हणाले की, पेरियार आंबेडकर कांशीराम यांचे वैचारिक सामाजिक आंदोलन समजून घेणे आवश्यक आहे. नितीन चाबुकस्वार म्हणाले कि रामायणाची गुरुकिल्ली समजून घेणे आवश्यक आहे. ताराबाई हिवराळे म्हणाल्या की, आपल्या समस्या निर्मूलनासाठी संघटन चालविण्याकरिता सामूहिक प्रयत्न केले पाहिजेत. मताचा वापर करून महागाई वाढविणारे सरकारे बदलली पाहिजेत.

मुख्य वक्ते साहित्यिक भीमराव सरवदे म्हणाले की, रामायणातील सत्य बाहेर येऊ नये म्हणून येवल्यातील ग्रंथालय उध्वस्त करण्यात आले होते. ज्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागला होता. असा परिवर्तनवादी विचारांचा इतिहास आहे. देव धर्माला पुढे करून जनतेला अंधत्वाकडे वळविले जाते याला पेरियारांचा कडाडून विरोध होता. यातून त्यांना बाहेर काढल्यास फार मोठी क्रांती होऊ शकेल. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष असताना ऐकले जात नाही आणि गुरूकुलमच्या वाईट अनुभवातून त्यांनी काँग्रेस सोडली. बाबासाहेब आंबेडकरांनी पुणे करारांवर सही करू नये असा त्यांचा आग्रह होता. स्टॅलिन फुले आंबेडकर पेरियारांचे परिवर्तनवादी आंदोलन पुढे नेत आहेत. मात्र महाराष्ट्रात या विचाराला प्रामाणिक नेतृत्व न मिळाल्याने या विचारांची अवहेलना होत आहे.

या कार्यशाळेची अध्यक्षता करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, पेरियार ई. व्ही. रामासामी यांचे परिवर्तनवादी विचारांना समजून घेऊन समाज जीवनात मशागत केली पाहिजे. जेणेकरून या विचारांना प्रस्थापित करण्यासाठी जनतेचे जन समर्थन मिळू शकेल. कांशीराम मेळावा घ्यायचे ज्यात जनतेला साध्या भाषेत फुले आंबेडकर पेरियार समजावून सांगताना म्हणायचे कि फुले हे पुण्याचे शिक्षण महर्षी, बाबासाहेब कोट टाय वाले बाबा तर पेरियार हे दाढी वाले बाबा असून दक्षिण भारतातील मागासवर्गीयांचे मुक्तीदाता आहेत. 'द रामायण अ ट्रु रिडींग' या पेरियारांच्या इंग्रजी पुस्तकाचे 'सच्ची रामायण' या नावाने ललई सिंह यांनी हिंदी भाषेत अनुवाद करून अशोक पुस्तकालयामार्फत प्रकाशित केले होते. ज्यावर उत्तर प्रदेश सरकारने ८ डिसेंबर १९६९ ला बंदी घातली होती. ज्याला ललई सिंह यादव यांनी अलाहाबाद उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. ज्यांचे १९ जानेवारी १९७१ ला अलाहाबाद उच्च न्यायालयाने ललई सिंह यांच्या बाजूने निकाल दिला. ज्यांला उत्तर प्रदेश सरकारने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले ज्याचा अंतिम निर्णय १६ सप्टेंबर १९७६ ला आला ज्या प्रमाणे उत्तर प्रदेश सरकार हरले आणि ललई सिंह यादव जिंकले. अशाप्रकारे त्या पुस्तकावरील बंदी उठविण्यात आली. उत्तर प्रदेशात सत्ता असताना कांशीराम यांनी लखनौ येथे पेरियार यांची जयंती साजरी केली आहे. ज्याला फार मोठ्या प्रमाणात त्या काळात समर्थन देणा-या पक्षांकडून विरोध झाला होता. तामिळनाडू सारख्या राज्यात पेरियारांच्या विचारांना प्राधान्य दिले जात असल्याने आजही त्या राज्यात ६९ टक्क्यांच्या पुढे आरक्षण दिले जात आहे. यांची अंमलबजावणी संपूर्ण देशात होण्याची नितांत आवश्यकता आहे.

या कार्यशाळेला सुधाकर दांडगे, हिरामण अहिरे, पी. एस. वाकळे, व्ही. डी. रामटेके, आर. एल. तलवारे, अमित बोरुडे, यशवंत विजय बोरुडे, नितीन चाबुकस्वार, ताराबाई देवेंद्र हिवराळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांनी विषयाच्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले आहे. शेवटी आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली.

# नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्यात बाप्पाची प्रतिष्ठापना

## यूनिटी मल्टीकॉन कंपनीचे सर्वधर्म समभावाचे दर्शन



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग सारख्या ऐतिहासिक किल्ल्यामध्ये गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली असून गणरायाचं पूजन युनिटी मल्टीकॉनचे मुख्य प्रवर्तक कफिल मौलवी यांच्या हस्ते करण्यात आले व्यवसाय क्षेत्रात उत्तुंग भरारी घेणाऱ्या सोलापूरातल्या युनिटी मल्टीकॉन्स प्रा.लि.ने सामाजिक व सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जोपसत गेल्या अनेक वर्षांपासून युनिटी मल्टीकॉन च्या वतीने नळदुर्ग शहरात ऐतिहासिक किल्ल्यामध्ये खूप मोठ्या पद्धतीने गणेश उत्सव साजरा करण्यात आला याच बरोबर सोलापूर मध्ये ही यूनिटी च्या वतीने गणेश उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो कंपनीचे कार्यकारी संचालक मुख्य प्रवर्तक कफिल मौलवी यांनी सर्व धर्म समभाव ही विचारधारा सांभाळून घेत त्यांच्या या संकल्पनेतूनच नळदुर्ग च्या ऐतिहासिक किल्ल्यात गणेश उत्सव साजरा केला जात आहे

ही संकल्पना गेल्या १२ वर्षांपासून हा उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातोय या दरमन्यान या गणेशाचे दर्शन घेण्यासाठी सोलापूर व परिसरातील राजकीय सामाजिक आणि उद्योग क्षेत्रातील अनेक मान्यवर येऊन अत्यंत शास्त्र शुद्ध पद्धतीने गणरायाची पूजा करून दर्शन घेतात. गणरायाच्या समोर अत्यंत सुंदर असा आरास देखावा केला गेला आहे..

युनिटीचे कार्यकारी संचालक कफिल मौलवी संचालक जयधवलं करकमकर आणि संचालिका वैशाली जैन हे स्वतः दररोज गणरायाच्या पूजेसाठी उपस्थित असतात युनिटी मल्टीकॉन कंपनीने गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करून समाजा समोर सामाजिकता अखंडता जोपासत समाजा समोर आदर्श निर्माण केला आहे .

## चांगले आहार आरोग्यदायी असते

### डॉ.विजयालक्ष्मी बाळेकंद्री यांचे प्रतिपादन

**विवेकानंद प्रतिष्ठान व्याखानमाला पुष्प पहिले.**



अक्कलकोट/प्रतिनिधी : विवेकानंद प्रतिष्ठान आयोजित गणेशोत्सव व्याख्यानमालेचे उद्घाटन मोठ्या थाटाने संपन्न झाले.व्याख्यानमालीचे प्रथम पुष्प गुंपण्यासाठी डॉ विजयालक्ष्मी बाळेकुंद्री (हृदयरोग तज्ञ बेंगलुरु) यांचा आहार व आरोग्य या विषयासंदर्भात व्याख्यान झाले. विषयाची मांडणी करताना , डॉ. विजयालक्ष्मी बाळेकुंद्री म्हणाल्या.अध्यात्मिक आरोग्य ला अधिक महत्व निर्माण झाले पाहिजे. मानसिक संतुलन काळाची गरज आहे. जेवढ चांगले आहार तेवढ आरोग्यदायी आयुष्य निर्माण करते आहे. चिंता ,आरोग्यासाठी घातक आहे ,माणसाच्या जीवनाला काम आणि क्रोध अधिक असल्यामुळे आरोग्याला घातक असू शकतो. असल्यामुळे सर्वप्रथम उद्घाटन, श्री स्वामी समर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले.आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी, सौ शांभवी कल्याणशेट्टी, श्री मल्लिनाथ कल्याणशेट्टी, डॉ , अमृता कोठी, डॉ मठ मॅडम,डॉ दिपक पाटील, श्रीमती ,पसरे मॅडम,मल्लिनाथ मजगे, पुजा कडबगकर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन , खंडेराव घाडगे सर, आभार रुग्गे यांनी केले.

## अभिजीत पाटील यांनी चौंडी येथील उपोषणास भेट घेऊन जाहीर पाठिंबा दिला

### पंढरपूर व मंगळवेढ्यातील समाजातील पदाधिकारी उपस्थित




पंढरपूर/प्रतिनिधीः पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जन्मगाव चौंडी येथे यशवंत सेनेच्या वतीने गेले १७ दिवस चालू असलेल्या आमरण उपोषणाला राष्ट्रवादीचे नेते श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील व पंढरपूर व मंगळवेढ्यातील धनगर समाजातील पदाधिकाऱ्यांसह भेट घेऊन जाहीर पाठिंबा पत्र दिले. गेली अनेक वर्षे महाराष्ट्रामध्ये धनगर समाज एस.टी. आरक्षणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्रभर लढा देत आहे. परंतु सरकार आज या लढ्याला गांभीर्याने पाहत नाही.

गेले ७० वर्षापासून धनगर जमातीला अनुसूचित जमातीच्या सवलतींपासून वंचित ठेवण्यात आले आहे. धनगड या शब्दाची धनगर अशी घटना दुरुस्ती करून केंद्र सरकारने अंमलबजावणी करावी, त्यासाठी राज्य सरकारने घटनादुरुस्तीचा अध्यादेश केंद्र सरकारला पाठवावा.

भारतात अनेक राज्यात धनगर समाजाला अनुसूचित जाती, जमातीच्या सर्व सवलती आरक्षण असल्यामुळे मिळत आहेत परंतु महाराष्ट्रामध्ये याचे फक्त राजकारण केले जात आहे. ही फार मोठी शोकांतिका आहे.त्यामुळे महाराष्ट्र सरकारने गांभीर्याने विचार करून धनगर समाजाला न्याय द्यावा अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रात आरक्षण आंदोलनाच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारचा निषेध करण्यात येईल. यशवंत सेनेचे उपोषणकर्ते श्री.अण्णासाहेब रुपनवर आणि श्री.सुरेश भाऊ बंडगर यांची तब्येत खालावली आहे. त्यांच्या जीवाला काही धोका निर्माण झाल्यास सरकार त्यास जबाबदार राहील. राज्य सरकारने धनगर आरक्षण अंमलबजावणी बाबत त्यासाठी त्वरित निर्णय घ्यावा हीच अपेक्षा.

यावेळी पंढरपूरचे आदित्य फत्तेपुरकर, विठ्ठल पाटील, संचालक बाळासाहेब हाके, सिद्धेश्वर बंडगर, धनामामा खरात, प्रवीण कोळेकर, रायाप्पा हळणवर, शालिवाहन कोळेकर, नारायण मेटकरी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील, कार्याध्यक्ष सचिन आटकळे, संजय शिंदे, दत्तात्रय येडगे, संतोष बंडगर, आनंद पाटील, आनंद मदने, बाबासाहेब येडगे, दत्ता खरात, अतुल गायकवाड यासह अनेक मंडळी उपस्थित राहून पाठिंबा दिला आहे...




## दसरा चौक मित्र मंडळाच्या वतीने सजीव देखावा

शिरोळ/नामदेव निर्मळेः घोसरवाड तालुका शिरोळ येथील आदर्श तरुण मंडळ म्हणून प्रचलित असणारे दसरा चौक मित्र मंडळ ग्राउंड ओपनिंग पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती सचिव मा. श्री. शिवराज दादा नाईकवाडे यांच्या हस्ते करण्यात आले मंडळ चे अध्यक्ष : लखन चव्हाण उपाध्यक्ष : सिध्दु कट्टेकरी व श्री जयपाल चौगुले व मंडळातील सदस्य यांनी ८ दिवस कष्ट करून या देखाव्यासाठी परीश्रम घेतली. एकूण मंडळात ९० सदस्य आहेत. २०१८ यावर्षी दसरा चौक मंडळाने जयपाल चौगुले यांच्या सहकार्याने ७०० नारळापासून नारळाचा गणपती तयार केला होता व गावात मंडळाचे कौतुक केले होते

## बेरोजगार महिला उमेदवारांसाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर आणि ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने

जिल्हयातील सुशिक्षित बेरोजगार महिला उमेदवारांसाठी मंगळवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय महिला रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील नोकरीइच्छुक महिला उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने हा रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, आय. टी. आय डिप्लोमा, ग्रॅज्युएट, कोणतीही पदवी, इलेक्ट्रीशीयन, नर्सिंग, बी.कॉम, अशा प्रकारची एकुण ११०० पेक्षा जास्त रिक्तपदे सोलापूर आणि पुणे येथिल उद्योजकांनी अधिसुचीत केलेली आहेत. नोकरी इच्छुक महिला उमेदवारांनी आपल्या कागदपत्रासह मंगळवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी ठीक १० वा. ए. आर. बुर्ला महिला वरिष्ठ महाविद्यालय, रविवार पेठ, राजेंद्र चौक, सोलापूर येथे मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.याबाबत काही अडचण आल्यास कार्यालयाच्या ०२१७-२९५०९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापुर येथे संपर्क साधावा, असे आवाहन सोलापूर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त एच.एस. नलावडे यांनी केले आहे.

## सागर कल्याणशेट्टी युवा मंच वतीने वागदरी परमेश्वर पर्व उत्सवात मोफत प्रवाशी वाहतूक सेवा



अक्कलकोट/प्रतिनिधी : परमेश्वर पर्व आराधना उत्सव निमित्त वागदरी येथे सागर कल्याणशेट्टी युवा मंच वतीने वागदरी अक्कलकोट, ते अक्कलकोट वागदरी मोफत प्रवाशी वाहतूक उद्घाटन हन्नूर गावाचे उपसरपंच सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रम अध्यक्षस्थानी एस एस शेळके प्रशालेचे चेअरमन बसवराज शेळके हे होते यावेळी प्रदीप जगताप, शरणप्पा मंगाणे, श्रीशैल ठोंबरे, कमलाकर सोनकांबळे, अशोक पोमाजी, दिनकर जावळे, शिवाजी सावंत, मठपती सर, शाम बनसोडे, शिवराज ( मंत्री ) पोमाजी, सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच अध्यक्ष शाम बाबर आदी उपस्थित होते

यावेळी बोलताना श्रीशैल ठोंबरे म्हणाले की शाम बाबर यांनी गेल्या अनेक वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात या वर्षापासून त्यांनी सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच वतीने मोफत वाहतूक सेवा ठेवल्या बद्दल त्याचे अभिनंदन या पुढे त्याचे सामाजिक विविध कार्यास भाजपा पशने आपल्या पाठीशी खंबीर उभे राहील त्यांनी समाजातील गोर गरीब जनतेसाठी आरोग्य सेवा असो किंवा त्याच्यावर झालेल्या अन्याय विरोध लढा असो त्याच्या प्रत्येक कार्यास आम्ही त्याच्या सोबत राहू सागर दादा कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शाखाली त्यांनी करत असलेले सामाजिक कार्य कौतकास्पद आहे

यावेळी भाजपा जिल्हा चिटणीसपदी बसवराज शेळके व जिल्हा कार्यकारणी सदस्यपदी श्रीशैल ठोंबरे यांची निवड झाल्याबद्दल सागर दादा कल्याणशेट्टी युवा मंच वतीने सत्कार करण्यात आले. यावेळी सुनील सांवत, संतोष पोमाजी, प्रकाश पोमाजी, मकबूल कणमुसे, पंकज सुतार, रवी पोमाजी, राज यादव, संतोष भालके, अस्लम मुल्ला, बसवराज वरनाळे, चंद्रकांत मातोळे , राहुल राठोड, होनप्पा कुंभार, बसवराज उडगी, अनिल संनमुखे, लक्ष्मण संनपुरे, सोहेल खिस्तिके, अभिषेक सनमुखे, मधूकर सांवत, शकील लगडे, गुरुनाथ भरमदे, सनी बाबर, परमेश्वर मुंजळे, अनिल पुरत, रमेश कणसे, यासह सर्व जीप चालक मालक यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

सूत्रसंचालन कमलाकर सोनकांबळे यांनी केले आभार महादेव सोनकवडे यांनी मानले

## मुंबई – सेंट पीटर्सबर्ग सिस्टर सिटी संदर्भातील सामंजस्य करारामुळे भारता आणि रशियाचे मैत्रीसंबंध दृढ होणार : विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर



मुंबई : भारत – रशियामध्ये राजकीय आणि वैचारिक नाते आहे. याचबरोबर मुंबई आणि सेंट पीटर्सबर्ग या शहराला सिस्टर सिटीची परंपरा लाभली आहे. या सिस्टर सिटी संदर्भात भविष्यात होणाऱ्या सामंजस्य करारामुळे रशिया आणि भारताचे मैत्रीपूर्ण संबंध दृढ होतील, असे विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी सांगितले. महाराष्ट्र विधिमंडळात रशियाच्या शिष्टमंडळाने आज विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर आणि विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची भेट घेतली. मुंबई–सेंट पीटर्सबर्गमधील प्रस्तावित सामंजस्य करारासंदर्भात विचार विनिमय या भेटीदरम्यान करण्यात आला.

अध्यक्ष श्री. नार्वेकर म्हणाले की, मुंबई आणि सेंट पीटर्सबर्ग या दोन्ही शहरांना सिस्टर सिटीची ५५ वर्षाची परंपरा आहे. या सिस्टर सिटी संदर्भातील सामंजस्य करारामुळे दोन्ही शहरांसह देशांतील नागरी, कृषी, व्यापार संदर्भातील समस्या सोडविण्यासाठी सहकार्य लाभणार आहे. रशिया भारताचा जुना मित्र देश असून, संसदीय, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक पद्धतीच्या देवाणघेवाणीमुळे उभय शहरासह देशांमध्येही नाते वृद्धिंगत होणार आहे. करारावर चर्चा करण्यासाठी भारतास भेट दिल्याबद्दल अध्यक्ष श्री. नार्वेकर यांनी यावेळी शिष्टमंडळाचे आभार मानले.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, उभय देशांत वैचारिक, राजकीय संवाद आहे. भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रशियासोबत मैत्रिपूर्ण संबंध अधिक दृढ केले आहेत. भविष्यातही व्यापार, तंत्रज्ञान, शाश्वत विकास, कृषी क्षेत्रातील संशोधन, राजकारण, साहित्य यासंदर्भात विचारांची देवाण-घेवाण करून प्रगतीसाठी संयुक्तिकरित्या प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. उभय देशाच्या प्रगतीसाठी रशियाने संसदीय कार्यपद्धतीचा अभ्यास करण्यासाठी भारत भेट दिली याचा आनंद झाला असल्याचे उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या.

सेंट पीटर्सबर्ग विधानसभेचे अध्यक्ष अलेक्झांडर बेलस्की यांनी मुंबई शहराच्या संस्कृती, पर्यटन, पायाभूत सुविधा, दळणवळण, पाणीपुरवठा, चित्रपटसृष्टी व्यवस्थानाबाबत कौतुक केले. तरूणांना शिक्षणासाठी पिटर्सबर्ग येथे पाठविल्यास आम्ही शैक्षणिक सहकार्य करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी विधिमंडळाचे आमदार रईस शेख, अमिन पटेल,

सचिव जितेंद्र भोळे यांच्यासह सेंट पीटर्सबर्ग विधानसभेच्या युनायटेड रशिया पक्षाच्या प्रमुख पावेल कुरपिंक, सेंट पीटर्सबर्गच्या विधानसभेच्या संपादकीय कमिटीचे उपाध्यक्ष ओलेगा मीयुता, सेंट पीटर्सबर्गच्या विधानसभेच्या आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्यक्ष श्रीमती आखो दोवा नर्गिस, रशियन फेडरेशन संघाचे महावाणिज्यदूत एच. इ. आलसकी सुरोस्तव, मुंबई रशियन हाऊसचे उप-वाणिज्य दूत तथा संचालक डॉ. एलिना रेमजोव्हा, रशियन फेडरेशनच्या वाणिज्यदूत जोरजी डेरे इर, वाणिज्यदूत येलेक्सी कलगीन, मुंबईच्या रशियन फेडरेशनचे उपवाणिज्यदूत लेक्स क्री सिलिनिकोव यावेळी उपस्थित होते. या शिष्टमंडळाने विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाला भेट दिली आणि कामकाजासंदर्भात माहिती जाणून घेतली.

## पुणे फेस्टिव्हलचे पर्यटनमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते उद्घाटन

### विविध सादरीकरणाच्या माध्यमातून संगीत, नृत्य, संस्कृतीचा अप्रतिम आविष्कार

पुणे : गणेशोत्सवाच्या निमित्ताने पुण्याच्या पर्यटनाला चालना देणाऱ्या आणि कला-संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविणाऱ्या ३५ व्या पुणे फेस्टिव्हलचे राज्याचे पर्यटनमंत्री गिरीष महाजन यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. पुणे फेस्टिव्हलमधील कार्यक्रमाचा दर्जा आणि कलाकारांना मिळणारे प्रोत्साहन पाहता हा महोत्सव ५० वर्ष पूर्ण करेल असा विश्वास व्यक्त करून पर्यटन विभागातर्फे महोत्सवाला यापुढेही सहकार्य मिळत राहील अशी ग्वाही श्री.महाजन यांनी यावेळी दिली. गणेश कला क्रीडा रंगमंच येथे आयोजित या कार्यक्रमाला राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष सुरेश कलमाडी, खासदार पद्मश्री हेमा मालिनी, रजनी पाटील, श्रीरंग बारणे, आमदार नाना पटोले, रवींद्र धंगेकर, पुणे फेस्टिव्हलचे उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल, मुख्य समन्वयक अभय छाजेड, उल्हास पवार, रमेश बागवे, मीरा कलमाडी आदी उपस्थित होते.

पर्यटनमंत्री श्री.महाजन म्हणाले, सुरेश कलमाडी आणि या महोत्सवाचे घट्ट नाते आहे. ३५ वर्ष असा कार्यक्रम सुरू ठेवणे कठीण कार्य आहे. पण सर्वांनी मिळून प्रयत्नपूर्वक या महोत्सवात सातत्य ठेवले. महोत्सवातील कार्यक्रम पाहता पुणे संस्कृतीचे माहेरघर असल्याचे स्पष्ट होते, असे त्यांनी सांगितले.लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला सुरुवात केली आणि त्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. पुणे फेस्टिव्हलला भेट देण्याची अनेक वर्षांपासून इच्छा होती असेही श्री.महाजन म्हणाले.

पालकमंत्री श्री.पाटील म्हणाले, पुणे फेस्टिव्हलची देशभरात 'मदर ऑफ ऑल फेस्टिव्हल' अशी ओळख निर्माण झाली आहे. १९८९ पासून हा उत्सव सातत्याने सुरू आहे. हा कार्यक्रम अधिकाधिक सुंदर व्हावा यासाठी सुरेश कलमाडी यांनी खूप कष्ट घेतले, असे त्यांनी सांगितले.



पुण्यात येऊन नृत्य सादर करणे ही गौरवाची बाब आहे. पुणे फेस्टिव्हलच्या माध्यमातून देशभरातील कलाकारांचा सन्मान होत आहे, अशा शब्दात खासदार हेमा मालिनी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.खासदार श्रीमती पाटील, श्री. बारणे, आमदार पटोले, पद्मविभूषणडॉ. के.एल. संचेती, उद्योगपती संजय घोडवत यांनीही यावेळी विचार व्यक्त केले.

श्री.कलमाडी यांनी स्वागतपर भाषणात स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळावे आणि पुण्याचे नाव देशात जावे या उद्देशाने पुणे फेस्टिवलची सुरुवात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या महोत्सवाने पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे कार्य केले, असेही ते म्हणाले.यावेळी ज्येष्ठ अस्थिशल्य विशारद पद्मविभूषण डॉ.के.एच.संचेती यांना जीवन गौरव पुरस्काराने आणि उद्योगपती संजय घोडावत यांना पुणे फेस्टिव्हल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शतकपूर्ती वर्ष साजरे करणाऱ्या खडकमाळ आळी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, श्री त्रिशुंड गणपती विजय मंडळ ट्रस्ट आणि सदाशिवपेठ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचादेखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात ५० कलाकारांनी केलेल्या शंखनादाने झाली. पद्मश्री हेमा मालिनी आणि सहकलाकारांनी नृत्याद्वारे गणेश वंदना सादर केली. नंदिनी राव गुजर यांनी तुलसीदास रचित गणेश स्तुती सादर केली. सानिया पाटणकर यांनी 'ऐ मेरे वतन के लोगो' हे देशभक्तीपर गीत सादर केले. यावेळी सुखदा खांडकेकर आणि सहकाऱ्यांनी 'नृत्य सीता' हा रामायणातील सीता हरणानंतराचा प्रसंग नृत्य नाटिकेच्या माध्यमातून सादर केला.

नृत्यविष्काराच्या माध्यमातून वारकरी परंपरेचे दर्शन घडविण्यात आले. शर्वरी जेमीनिस आणि सहकाऱ्यांनी सादर केलेल्या 'हिस्टोरीकल एम्पायर्स ऑफ इंडिया' या नृत्याविष्काराला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रीयन मंडळ पुणेच्या खेळाडूंनी आर्टिस्टिक योगाच्या माध्यमातून भारतीय योग परंपरेचे अप्रतिम सादरीकरण केले. हेमा मालिनी यांच्या चित्रपट करकीर्दीवर आधारित नृत्य सादरीकरणही यावेळी करण्यात आले. सांस्कृतिक कार्यक्रमाचा समारोप लावणी फ्युजनने झाला.